**कृपया प्रसिध्दीसाठी -** **18 फेब्रुवारी 2009**

## माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक व झोपडपट्टी बचाव समिती, कांदिवली पश्चिमचे संयोजक श्री.बाबा सिंह यांनी बुधवार, 18 फेब्रुवारी 2009 रोजी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत केलेले निवेदन

### *<u>चारकोप मेट्रोसाठी निविदा न येण्यामागचे खरे कारण जनतेचा कारशेडला असलेला विरोध - राम नाईक</u>*

**मुंबई, बुधवार** : "मेट्रो रेल्वेच्या चारकोप-मानखुर्द मार्गासाठी तीनदा निविदा काढूनही त्या भरण्यात आल्या नाहीत. याला मंदी व कंपन्यांचे परस्पर हितसंबंध कारणीभूत आहेत असे एमएमआरडीए व महाराष्ट्र सरकार सांगत असले, तरी याचे खरे कारण चारकोप कारशेड प्रकल्पाला होणारा स्थानिक नागरिकांचा जबरदस्त विरोध आहे; हे एमएमआरडीए व महाराष्ट्र सरकारने ध्यानी घेतले पाहिजे," असे संयुक्त प्रतिपादन माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक आणि झोपडपट्टी बचाव समिती, कांदिवली पश्चिमचे संयोजक श्री.बाबा सिंह यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

प्रस्तावित चारकोप मेट्रो कार शेड प्रकरणाची माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले, "एमएमआरडीए ने चारकोप येथे प्रस्तावित केलेल्या कारशेडमुळे संजयनगर, लालजीपाडा, गांधीनगर, एकता नगर, जनता कॉलनी या झोपडपट्ट्यांतील तीस हजारांहून अधिक नागरिक बेघर होणार आहेत. त्यामुळे सदर कारशेडची जागा बदलण्यात यावी या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी, शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, बसपा, समाजवादी पार्टी, मनसे, रिपब्लिकन पार्टी, आदी सर्व राजकीय पक्षांनी तसेच सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन झोपडपट्टी बचाव समिती स्थापन करुन जनआंदोलन सुरु केले आहे. समितीने हजारो नागरिकांच्या सह्यांचे मुख्यमंत्र्यांना तसेच पंतप्रधानांना निवेदन देऊन प्रस्तावित कारशेडची जागा बदलण्याची विनंती केली होती. पर्यायी रिकामा भूखंड उपलब्ध आहे असेही समितीने सांगितले आहे. या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी गेल्या दोन महिन्यांत मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना तीन पत्रे पाठवून वेळ मागितला परंतु त्यांच्याकडून अद्याप प्रतिसाद नाही. याशिवाय या संदर्भात राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेला आक्षेप घेऊनही त्याबाबतही अद्याप सुनावणी झालेली नाही. सदर जागी एमएमआरडीएचे अधिकारी जेव्हा सर्वेक्षणासाठी गेले तेव्हा त्यांना उत्स्फुर्त आंदोलनास सामोरे जावे लागल्याने ते काम करु शकले नाहीत. या सर्व गोष्टींमुळे सदर कारशेडसाठी व मेट्रो मार्गासाठी निविदा भरण्यात व्यावसायिक शहाणपण नाही असेच या बड्या कंपन्यांना वाटले असणार."

सदर प्रकल्पासाठी आत्तापर्यंत तीनदा निविदा मागविण्यात आल्या.  तरीही निविदा न आल्याने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात येत असल्याचे एमएमआरडीएच्यावतीने सांगण्यात आले.  या मार्गासाठी केंद्र सरकारने रु.1,532 कोटींचा निधी देऊ करुनही केवळ सरकारच्या आडमुठेपणामुळे मेट्रोचे काम सुरु होऊ शकलेले नाही.  "एमएमआरडीएचा अधिकारी वर्ग व राज्य सरकार यांनी मंदी आणि कंपन्यांचे परस्परांत गुंतलेले हितसंबंध यांमुळे निविदा भरल्या गेल्या नाहीत अशी  कारणे देत बसण्यापेक्षा आत्मसंशोधन केल्यास जनभावना न्याय्य आहे हे लक्षात येईल.  महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पाबद्दल पुनर्वसनाचे धोरणही अद्याप जाहीर केलेले नाही. प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वी वेळीच कारशेडची जागा बदलल्यास मेट्रोचे काम पूर्ण होऊ शकेल. जनतेचा विरोध असतानाही व्यावसायिक धोका पत्करुन कंपन्या निविदा सादर करण्यासाठी पुढे येतील अशा भ्रमात सरकारने राहू नये. चारकोप येथे दुसरे ‘सिंगूर’ व्हावे अशी तर या सरकारची इच्छा नाही नां ?" असा प्रश्नही श्री.नाईक यांनी यावेळी केला.

श्री.नाईक आणि श्री.बाबा सिंह यांच्याबरोबर झोपडपट्टी बचाव समितीचे अन्य सदस्यही उपस्थित होते.

**(बाबा सिंह) करिता.**